महाराष्ट्र शासन

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

(जागतिक बँक सहाय्यित उपक्रम)

जा.क्र स्मार्ट/मं.प्र.अ/सीबीओ/अनु.वित/१३६९ /२०२२ दि. /०७/२०२२ २८/७/२०२२

प्रति,

मा. विभागप्रमुख, पीआययू,

पशुसंवर्धन, एमएसआरएलएम, माविम, कृषि, व्हीएसटीएफ, एमसीडीसी

विषय :- राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीने मंजूरी दिलेल्या समुदाय आधारित संस्थांना करावयाच्या अनुदान वितरणाबाबत.

संदर्भ :- १) स्मार्ट प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP)

२) स्मार्ट वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका (FMM)

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत संदर्भीय क्र.१ अन्वये राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती (SPAC) मध्ये समुदाय आधारीत संस्थांच्या उपप्रकल्पांना मंजूरी देण्यात येते. मंजूरी देण्यात आलेल्या समुदाय आधारित संस्थांना संदर्भ क्र. २ अन्वये प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेकडून (PIU) PFMS द्वारे अनुदान वितरीत करण्यात येते. परंतु प्रकल्पाच्या सुरवातीस प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेकडे प्रकल्पासाठीचे मनुष्यबळ उपलब्ध नव्हते. त्यामुळे मंजूर केलेल्या पथदर्शी उपप्रकल्पांना प्रकल्प समन्वय व सनियंत्रण कक्षाकडून (PCMU) अनुदान प्रस्तावाची छाननी करून पीआययूस अनुदान उपलब्ध करून देण्यात येत होते. सद्यस्थितीत पीआययू कडे प्रकल्पासाठीचे मनुष्यबळ उपलब्ध झालेले आहे. तरी यापुढे प्रकल्प अंमलबजावणी कक्षस्तरावर (PIU) सीबीओंच्या अनुदान मागणीच्या प्रस्तावाची छाननी करून PCMU कडे सीबीओनिहाय अनुदानाची मागणी करावी.

१) स्मार्ट प्रकल्पातील उपप्रकल्पासाठी अनुदानाचे टप्पे निधी वितरण व्यवस्था

१.१) उत्पादक भागिदारी उपप्रकल्प, बाजार संपर्कवाढ उपक्रकल्प व धान्य गोदाम आधारित उपप्रकल्प-४ टप्पे :

अ. क्र.	हप्त्यांची संख्या	स्मार्ट प्रकल्पाकडून मिळणाऱ्या एकूण प्रकल्प अनुदानापैकी, प्रत्येक हप्त्यामधील टक्केवारी	प्रकल्प अनुदानाचे स्वरुप
१.	पहिला हप्ता	५० टक्के	अग्रीम
२.	दुसरा हप्ता	३० टक्के	अग्रीम
३.	तिसरा हप्ता	१० टक्के	अग्रीम
४.	चौथा व अंतिम हप्ता	१० टक्के	प्रतिपुर्ती

१.२) नाविन्यपूर्ण भागिदारी उपप्रकल्प या उपप्रकल्पासाठी, स्मार्ट प्रकल्प अनुदानाची टक्केवारी -

या उपप्रकल्पाच्या एकूण किंमतीमध्ये स्मार्ट प्रकल्पाकडून ६०% मर्यादेत किंवा रक्कम रुपये ५० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान मिळेल. नाविन्यपूर्ण भागिदारी उपप्रकल्प या उपप्रकल्पासाठी प्रकल्प अनुदानाचे टप्पे -

अ. क्र.	हप्त्यांची संख्या	स्मार्ट प्रकल्पाकडून मिळणाऱ्या एकूण प्रकल्प अनुदानापैकी, प्रत्येक हप्त्यामधील टक्केवारी	प्रकल्प अनुदानाचे स्वरुप
१.	पहिला हप्ता	५० टक्के	अग्रीम
२.	दुसरा हप्ता	५० टक्के	प्रतिपुर्ती

२) <u>सीबीओंना प्रथम अनुदान हप्त्याचे वितरण करताना PIU स्तरावर खालीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी.</u>

२.१) उपप्रकल्पास State Project Approval Committee चे मंजुरी आदेश

२.२) सीबीओची विहित नमुन्यात अनुदान मागणी.

२.३) जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची (DIU) अनुदान मागणी शिफारस. (केवळ PIU Agri करिता)

२.४) विभागस्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची (RIU) अनुदान मागणी शिफारस. (केवळ PIU-Agri करिता)

२.५) अनुदान करारनामा (Grant Agreement) - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, लाभार्थी संस्था व लाभार्थ्यांच्या बँक यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार

२.६) सीबीओ कर्ज घेणार असल्यास - बँकेचे कर्ज मंजुरीचे पत्र तसेच प्रकल्पाकरिता स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये स्वहिस्सा बँकेत जमा केल्याचे बँकेचे व्यवस्थापक आणि सीबीओचे संचालक यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह अद्यावत बँक स्टेटमेंट.

२.७) सीबीओ कर्ज घेणार नसल्यास - प्रकल्पाकरिता स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये स्वहिस्सा बँकेत जमा केल्याचे बँकेचे व्यवस्थापक तसेच सीबीओचे संचालक यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह अद्यावत बँक स्टेटमेंट.

२.८) टॅली प्रमाणपत्र (नमूना-४) - प्रकल्पासाठी लेखांकन करण्यासाठी Tally किंवा तत्सम प्रणालीची खरेदी व लेखांकन करण्यासाठी Tally साक्षांकित लेखापालाची नियुक्ती.

२.९) सीबीओचे मंजूर बांधकाम/ शेडची क्षमता योग्य असल्याचे RIU चे पत्र.

२.१०) सीबीओस मंजूर गोदाम बांधकाम / शेड बांधकामास सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचा परवाना / मंजूरी पत्र (ग्रामपंचायत, नगरविकास, नगरपालिका इ.)

उपरोक्त प्रमाणे आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून सीबीओस प्रथम अनुदान हप्त्याचे वितरण करावे.

३) सीबीओंना व्दितीय अनुदान हप्त्याचे वितरण करताना PIU स्तरावर खालीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी.

३.१) सीबीओची विहित नमुन्यात अनुदान मागणी.

३.२) जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची (DIU) अनुदान मागणी शिफारस. (केवळ PIU-Agri करिता)

३.३) विभागस्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची (RIU) अनुदान मागणी शिफारस. (केवळ PIU-Agri करिता)

३.४) पहिल्या हप्त्यापोटी एकुण जमा झालेल्या रकमेपैकी ७०% रक्कम खर्ची पडल्यानंतर दुसरा टप्पा वितरीत करणे.

३.५) झालेल्या खर्चाचे सनदी लेखापालाचे उपयोगिता प्रमाणपत्र (CA certified Expenditure Certificate).

३.६) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले, आत्तापर्यंत झालेल्या खर्चाची बिले.

३.७) सीबीओ कर्ज घेणार असल्यास - बँकेचे कर्ज मंजुरीचे पत्र तसेच व्दितीय स्वहिस्सा बँकेत जमा केल्याचे बँकेचे व्यवस्थापक आणि सीबीओचे संचालक यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह अद्यावत बँक स्टेटमेंट.

३.८) सीबीओ कर्ज घेणार नसल्यास - व्दितीय स्वहिस्सा बँकेत जमा केल्याचे बँकेचे व्यवस्थापक तसेच सीबीओचे संचालक यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह अद्यावत बँक स्टेटमेंट.

३.९) संबंधित जिल्हा अंमलबजावणी कक्ष / प्रकल्प अंमलबजावणी कक्ष येथील लेखापाल / उपलब्धतेनुसार अधिकारी/कर्मचारी यांनी सादर केलेला व संबंधित कार्यालय प्रमुखाने स्वाक्षरी केलेला तपासणी अहवाल. (सोबत नमुना - क्र.१)

३.१०) तांत्रिक शाखेने केलेली मोका तपासणी अहवाल व स्थळाच्या ठिकाणी काढलेल्या फोटो (geo-tagged)

३.११) कर कपाती (IT TDS, GST TDS, Labour cess, Labour Insurance, Royalty) व इतर कपाती करुन त्या शासन तिजोरीत जमा केल्याबाबतचे कागदपत्र (चलन) जोडणे आवश्यक.

३.१२) लाभार्थी सीबीओ स्तरावर होणाऱ्या बांधकामा संदर्भात, R.A. बिलाच्या अनुषंगाने, सोबत सहपत्रित Annexure १ ते ९ नुसार आवश्यक कागदपत्रे.

वरील प्रमाणे आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून सीबीओस द्वितीय अनुदान हप्त्याचे वितरण करावे.

४) सीबीओंना तृतीय अनुदान हप्त्याचे वितरण करताना PIU स्तरावर खालीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी.

४.१) सीबीओची विहित नमुन्यात अनुदान मागणी.

४.२) जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची (DIU) अनुदान मागणी शिफारस. (केवळ PIU-Agri करिता)

४.३) विभागस्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची (RIU) अनुदान मागणी शिफारस. (केवळ PIU-Agri करिता)

४.४) पहिल्या हप्त्यापोटी (प्रकल्प अनुदान हिस्सा व लाभार्थी हिस्सा) एकुण जमा झालेल्या रकमेपैकी १००% रक्कम व दुसऱ्या हप्त्यापोटी (प्रकल्प अनुदान हिस्सा व लाभार्थी हिस्सा) एकुण जमा रकमेच्या ७०% रक्कम खर्ची पडल्यानंतर तिसरा टप्पा वितरीत करणे.

४.५) झालेल्या खर्चाचे सनदी लेखापालाचे उपयोगिता प्रमाणपत्र (CA certified Expenditure Certificate).

४.६) सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले, आत्तापर्यंत झालेल्या खर्चाची बिले.

४.७) सीबीओ कर्ज घेणार असल्यास - बँकेचे कर्ज मंजुरीचे पत्र तसेच तृतीय स्वहिस्सा बँकेत जमा केल्याचे बँकेचे व्यवस्थापक आणि सीबीओचे संचालक यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह अद्यावत बँक स्टेटमेंट.

४.८) सीबीओ कर्ज घेणार नसल्यास - तृतीय स्वहिस्सा बँकेत जमा केल्याचे बँकेचे व्यवस्थापक तसेच सीबीओचे संचालक यांच्या शिक्का व स्वाक्षरीसह अद्यावत बँक स्टेटमेंट.

४.९) संबंधित जिल्हा अंमलबजावणी कक्ष / प्रकल्प अंमलबजावणी कक्ष येथील लेखापाल / उपलब्धतेनुसार अधिकारी/कर्मचारी यांनी सादर केलेला व संबंधित कार्यालय प्रमुखाने स्वाक्षरी केलेला तपासणी अहवाल. (सोबत नमुना - क्र.१)

४.१०) तांत्रिक शाखेने केलेली मोका तपासणी अहवाल व स्थळाच्या ठिकाणी काढलेल्या फोटो (geo-tagged)

४.११) कर कपाती (IT TDS, GST TDS, Labour cess, Labour Insurance, Royalty) व इतर कपाती करुन त्या शासन तिजोरीत जमा केल्याबाबतचे कागदपत्र (चलन) जोडणे आवश्यक.

४.१२) लाभार्थी सीबीओ स्तरावर होणाऱ्या बांधकामा संदर्भात, R.A. बिलाच्या अनुषंगाने, सोबत सहपत्रित Annexure १ ते ९ नुसार आवश्यक कागदपत्रे.

वरील प्रमाणे आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून सीबीओस तृतीय अनुदान हप्त्याचे वितरण करावे.

५) <u>सीबीओंना चौथ्या व अंतिम अनुदान हप्त्याचे वितरण करताना PIU स्तरावर खालीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी.</u>

५.१) सीबीओची विहित नमुन्यात अनुदान मागणी.

५.२) जिल्हास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची (DIU) अनुदान मागणी शिफारस. (केवळ PIU-Agri करिता)

५.३) विभागस्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची (RIU) अनुदान मागणी शिफारस. (केवळ PIU-Agri करिता)

५.४) प्रकल्पाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल यांचेकडून - लेखापरिक्षण अहवाल व चौथ्या हप्त्याशी निगडीत, झालेल्या खर्चाची प्रमाणित केलेली बिले.

५.५) तांत्रिक शाखेने केलेली मोका तपासणी अहवाल व स्थळाच्या ठिकाणी काढलेल्या फोटो (geo-tagged)

<u>चौथ्या व अंतिम हप्त्याचे निधी वितरण संदर्भात, समुदाय आधारित संस्थेने त्या हप्त्याशी निगडीत पूर्ण रक्कम आधी खर्च करावयाची आहे व झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती प्रकल्पाकडून करावयाची आहे.</u>

वर नमुद केलेली निधी वितरण व्यवस्था ही उत्पादक भागिदारी उपप्रकल्प (Productive Partnership Proposal - PP), बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प (Market Access Plan - MAP) व धान्य गोदाम आधारित उपप्रकल्प (Collateral Management Plan - CMP) यांना लागू असेल.

तथापि, बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प (Market Access Plan - MAP) प्रकाराच्या उपप्रकल्पांना, बाजार संशोधन (Market research) अपेक्षित आहे. सदर बाबीसाठी प्रकल्पामध्ये रक्कम रु. १० लाखाच्या मर्यादेत अनुदान उपलब्ध होऊ शकते. बाजार संशोधनासाठी देण्यात आलेल्या अनुदानातून पुढील बाबींवर खर्च अनुज्ञेय असेल - प्रवास खर्च, सर्वेक्षण, बाजार अभ्यासासाठी नियुक्त सल्लागाराची फी इत्यादी. सदरचा निधी प्रकल्पाकडून लाभार्थी संस्थेस दोन टप्प्यात उपलब्ध होईल. निधी उपलब्ध होण्यासाठीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल-

अ) प्रकल्पास प्राथमिक मान्यता मिळाल्यानंतर, लाभार्थी संस्था, बाजार संशोधन करावयास व त्या अनुषंगाने प्रकल्पाकडून अनुदान प्राप्त करुन घेण्यास, पात्र असेल.

आ) लाभार्थी संस्थेने प्रकल्पास बाजार संशोधनासाठीचे अंदाजपत्रक सादर करावयाचे आहे.

इ) बाजार संशोधनासाठी प्रकल्प निधी प्रकल्पाकडून दोन टप्प्यात उपलब्ध होईल. त्यापैकी प्रथम टप्प्याचे, ५०% अनुदान, हे अग्रिम स्वरुपात असेल व उर्वरित ५०% अनुदान, हे प्रतिपूर्तीच्या स्वरुपात असेल.

ई) उपरोक्त प्रतिपूर्ती उपप्रकल्पांना देण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी कक्षांनी खालील पूर्व अटी व त्या अनुषंगिक कागदपत्रांची तपासणी करणे आवश्यक -

i. पूर्वी सादर केलेले अंदाजपत्रक
ii. झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र.
iii. झालेल्या खर्चाची देयके.
iv. Study report (if any)
v. Geo-tagged photographs
vi. दौऱ्याशी संदर्भात इतर कागदपत्रे (तिकिट, बोर्डींग पास इ.)

याबाबतच्या सर्व नस्तीचे लेखापरीक्षण हे प्रकल्पाच्या अंतर्गत व बाह्य लेखपरीक्षकाकडून करण्यात येणार आहे. तसेच संपादनाचे लेखापरीक्षण हे जागतिक बँके कडून करण्यात येते. त्यामुळे सीबीओस अनुदान वितरीत करत असताना प्रकल्पाच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करुन तसेच संपादन व्यवस्थापन पुस्तिका, संपादन मार्गदर्शक सूचना व वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका याचा अवलंब करून कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

(दशरथ तांभाळे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक,स्मार्ट

प्रत :- नोडल अधिकारी, पीआययु - कृषि, पशुसंवर्धन, एमएसआरएलएम, माविम, एमसीडीसी, VSTF यांना माहिती व कार्यवाहीसाठी.